साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...

न्यू सुधांशू प्रिंटर्स

श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075

कापडी पिशव्या छापून मिळतील.




भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

- संपादक

## १३ कोटी २६ लाख रुपयांच्या फसवणूक प्रकरणी 'राजस्थानी'च्या संचालकांविरूद्ध गुन्हा दाखल

परळी वैजनाथ, (बातमीदार):- अपहार आणि घोटाळ्यात अडकलेल्या येथील राजस्थानी नागरी सहकारी पतसंस्थेच्या तब्बल १७१२ ठेवीदारांची १३ कोटी २६ लाख ८६ हजार २३१ रुपयांची फसवणूक करून अपहार केल्याप्रकरणी संचालक मंडळांवर येथील शहर पोलिस ठाण्यात गुरूवारी (दि.१४) गुन्हा दाखल झाला आहे. सध्या प्रशासक असलेल्या या पतसंस्थेचे लेखा परिक्षण झाले आहे. बीड येथील जिल्हा विशेष लेखापरीक्षक सतीश पोकळे यांच्या फिर्यादीवरून या संस्थेच्या ११ संचालकाविरूद्ध हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राजस्थानी नागरी सहकारी पतसंस्था परळीचे १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२४ दरम्यान करण्यात आलेल्या विशेष लेखापरिक्षणामध्ये एकूण १७१२ ठेवीदारांची १३ कोटी रुपयांची फसवणूक करून अपहार करण्यात आल्याचे या लेखापरिक्षणात समोर आले असून याप्रकरणी बीड येथील सहकारी संस्थेचे विशेष लेखापरीक्षक सतीश पोकळे यांनी परळी शहर ठाण्यात गुरुवारी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी राजस्थानी नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष चंदूलाल बियाणी यांच्यासह संचालक बद्रीनारायण बाहेती, अभय वाकेकर व इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पुढील तपास पोलिस निरीक्षक रघुनाथ नाचन हे करीत आहेत. ***

## भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण



बीड, (जिमाका):- भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शुक्रवार, दि.१५ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी ९.०५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथील प्रांगणात होणार आहे. तसेच मुख्य शासकीय ध्वजारोहणानंतर सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. या मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमास जिल्हातील स्वातंत्र्य सैनिक, जेष्ठ नागरिक, माननीय खासदार व आमदार, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी, पत्रकार यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे. ***

## परळी रेल्वे उड्डाणपुलाच्या दुरूस्तीचे काम पूर्ण तीन आठवड्यानंतर पुलावरून सुरू झाली वहातूक

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी शहरातील रेल्वे उड्डाणपुलाच्या दुरूस्तीचे काम पूर्ण झाले असून सुमारे तीन आठवड्यानंतर म्हणजे गुरूवारी (दि.१४) रात्रीपासून या पुलावरून सर्व वहानांची वहातूक पूर्ववत सुरू झाली आहे. यामुळे वाहानचालकांसह सर्वसामान्य नागरिकांची गैरसोय दूर झाली आहे.



परळीतील रेल्वे उड्डाणपुलाची उभारणी झाल्यानंतर गेल्या तीस वर्षात प्रथमच पुलाच्या दुरूस्तीचे काम प्रशासनाने हाती घेतले होते. शासनाच्या राष्ट्रीय महामार्ग उपविभाग लातूर कार्यालयाच्या वतीने हे काम सुरू करण्यात आले होते. यामुळे गेल्या पंधरा जुलै पासून परळीतील रेल्वे उड्डाणपुलावरील जड वहातूक थांबवण्यात आली होती. पायी चालणारे व दुचाकी चालक यांनाच दुरूस्तीच्या काळात पुलावरून ये-जा करण्यास परवानगी देण्यात आली होती. यामुळे परळी शहरातून जाणारी व शहरात येणारी जड वहाने टोकवाडी-जिरेवाडी मार्गे वळवण्यात आली. यामुळे वहानधारकांची मोठी गैरसोय झाली. मोठा वेळ गेला. पाच ऑगस्टला दुरूस्तीचे हे काम पूर्ण होणार होते. तशी तारीखही संबंधित विभागाने दिली होती. परंतु मुदतीत काम न झाल्याने संबंधित गुत्तेदारोन मुदतवाढ मागीतली होती. गुरूवारी (दि.१४) ऑगस्ट रोजी या पुलाच्या दुरूस्तीचे काम पूर्ण झाले असून गुरूवारी रात्रीपासून या पुलावरून सर्व वहानांची वहातूक सुरू झाली आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह वहानचालकाची गैरसोय दूर झाली आहे. या दुरूस्तीमुळे पुढील पंचवीस ते तीस वर्षे उड्डाणपुलाचे आयुष्य वाढणार आहे. अशी माहिती सूत्राने दिली. ***

## इस्कॉनच्या वतीने रविवारी श्रीकृष्ण जन्मोत्सव

परळी वैजनाथ, (बातमीदार):- आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघ (इस्कॉन) च्या वतीने श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त रविवारी (दि.१७) येथे श्रीकृष्ण जन्म महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील वैद्यनाथ सहकारी औद्योगिक वसाहतीच्या सभागृहात सायंकाळी पाच वाजता हा कार्यक्रम सुरू होणार आहे. यात कीर्तन, अभिषेक, कृष्ण कथा, महाआरती, महाप्रसाद असे कार्यक्रम होणार आहेत. या महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन इस्कॉनच्या वतीने करण्यात आले आहे. **



## झुरूळे गोपीनाथ मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सव

परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील गणेशपार भागातील झुरूळे गोपीनाथ गल्लीत असलेल्या श्री झुरूळे गोपीनाथ प्राचीन मंदिरात शुक्रवारी श्रीकृष्ण जन्माष्टमी साजरी होणार आहे. या भागात तळघरात श्री झुरूळे गोपीनाथाचे प्राचीन मंदिर आहे. श्रीकृष्ण जयंतीदिनी हजारो भाविक येथे दर्शनासाठी येथे येतात. यंदा शुक्रवारी श्रीकृष्ण जन्मोत्सव येथे साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त रात्री अभिषेक, आरती, पूजा आदी कार्यक्रम होणार आहेत. या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन मंदिराचे पुजारी श्री बडवे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. **

## वैद्यनाथ बँकेवर जनसेवा पॅनलचे वर्चस्व

परळी वैजनाथ, (बातमीदार):- मराठवाड्यातील अग्रगण्य बँक म्हणून परिचित असलेल्या दि वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव बँकेच्या संचालक मंडळ निवडणूकीत झालेल्या १३ जागेच्या निवडणूकीत पंकजा मुंडे व धनंजय मुंडे यांच्या संयुक्त नेतृत्वाखालील लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलचे सर्व उमेदवार निवडून आले आहेत. या पॅनलच्या चार जागा यापूर्वीच बिनविरोध निवडून आल्या होत्या. निवडणूक निकालानंतर सर्वच्या सर्व संचालक मंडळाच्या जागा या पॅनलच्या आल्याने बँकेवर पुन्हा एकदा मुंडे बंधू भगिनींचे वर्चस्व कायम राहिले आहे.

वैद्यनाथ को-ऑपरेटिव बँकेच्या एकूण १७ संचालकांच्या जागा आहेत. यापैकी चार जागा यापूर्वी बिनविरोध निवडून आलेल्या आहेत. सर्वसाधारण मतदारसंघाच्या बारा जागेसाठी आणि भटक्या विमुक्त जाती मतदारसंघातील एका जागेसाठी अशा एकूण १३ जागेसाठी प्रत्यक्ष मतदान झाले. या निवडणुकीत मंत्री पंकजा मुंडे व माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखालील लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनल आणि महाविकासआघाडीच्या वतीने वैद्यनाथ परिवर्तन पॅनलने निवडणूक लढवली. मात्र महाविकास आघाडीच्या वैद्यनाथ परिवर्तन पॅनल मध्ये खुल्या प्रवर्गातून केवळ दोनच उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवले होते. तर भटक्या विमुक्त जाती प्रवर्गात शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी निवडणूक लढवली होती. १० ऑगस्ट रोजी या निवडणुकीसाठी प्रत्यक्ष मतदान झाले. आज बारा ऑगस्ट रोजी या निवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया पार पडली. यामध्ये राजेभाऊ फड यांना केवळ चौदाशे सहा मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलचे उमेदवार रमेश कराड यांना १४ हजार ७०० मते मिळाली. ही जागा दणदणीत मतांनी विजयी झाली. तर सर्वसाधारण मतदारसंघातील बारा जागेसाठी मतदान झाले होते. या बाराला बारा जागा लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या उमेदवारांनी जिंकलेल्या आहेत. जिंकून आलेल्या उमेदवारांचे मताधिक्यही मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे पुन्हा एकदा बँकेच्या सभासदांनी पंकजा मुंडेंच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केले आहे.

दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी अनेक वर्ष या बँकेचे नेतृत्व केलेले आहे. आज पर्यंत त्यांच्याच विचाराचे आणि त्यांच्याच नेतृत्वाखालील संचालक मंडळ या बँकेचे व्यवस्थापन करत आले आहे. दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांच्यानंतर बँकेचे नेतृत्व पंकजा मुंडे यांनी केले. पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे विरोधात असताना अतिशय चुरशीने या बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुका झाल्या. मात्र त्यावेळीही सभासदांनी पंकजा मुंडे यांनाच हे नेतृत्व बहाल केले होते. या निवडणूकीच्या वेळी तर पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे या दोघांनी एकत्रितपणे नेतृत्व करत ही निवडणूक लढवल्याने प्रारंभी पासूनच ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता होती. मात्र विरोधी तीन उमेदवारांनी अर्ज दाखल केले व अर्ज माघारी घेतली नाही. त्यामुळे निवडणूक अटळ झाली. मात्र तरीही या निवडणुकीत मुंडेंच्या बाजूनेच सभासद कौल देणार या अपेक्षित होते. त्याचप्रमाणे निवडणुकीच्या निकालातही तसेच घडले असुन प्रतिस्पर्धी पॅनलच्या उमेदवारांना फारसे मताधिक्य घेता आलेले नाही. **

# निवडणूक आयोगावर राहूल गांधी यांनी केलेल्या आरोपांशी परळी काँग्रेस सहमत - बहादूरभाई

परळी वैजनाथ, (बातमीदार):- काँग्रेस नेते राहूल गांधी यांनी केंद्रीय निवडणूक आयोगावर केलेल्या आरोपांशी परळी काँग्रेस सहमत असल्याचे सांगत २०१९ पासून परळी विधानसभा मतदारसंघाच्या यादीतही मोठी गडबड असल्याचा आरोप परळी शहर काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादूर भाई यांनी आज दिनांक १२ ऑगस्ट रोजी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत केला. यावेळी त्यांनी परळी विधानसभा मतदारसंघातील झालेल्या गडबडीचे काही व्हिडिओ चित्रण पत्रकारांना दाखविले.

शहरातील नवीन व्हीआयपी रेस्ट हाऊस येथे बारा ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजता शहर काँग्रेसच्या वतीने मतचोरी में हेराफेरी या काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या पत्रकार परिषदेचा काही भाग पत्रकारांना दाखविण्यात त्यानंतर काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई पत्रकारांशी बोलताना म्हणाले की,परळीतील



निवडणुकीत सुध्दां राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांसारखी झाली आहे. निवडणुकांमध्ये राज्य शासनाच्या अधिन कर्मचारी निवडणूक काम करतात. ते स्थानिक खासदार, आमदार,यांचेच ऐकतात आणि तसेच त्यांना अपेक्षित आहे त्याप्रमाणे कामकाज करतात.मग निवडणूक यादी बनविणारे बीएल.ओ.प्रशासनाच्या अंतर्गत काम करत असतात.तो प्रामाणिक पणे काम करत नाही.सदर बीएलओ स्थानिक नेत्यांच्या हवाली फार्म देतात आणि भरुन घेतात.

परळी शहरात प्रत्येक बुथवर १०० ते१५० अतिरिक्त मते असल्याचे सांगताना एकूणच मतदार यादीतील घोळ याबाबत त्यांनी स्पष्टीकरण दिले.साधारण दहा हजार मते बाहेरची जोडली गेली आहेत.भाजपा अनेक बाहेरील मतदारांचा वापर करते. आणि मतदानाच्या दिवशी या बाहेरील लोकांना परळीत आणले जाते.परळीतही असे अनेक बाहेरील मतदार दुपारी चार नंतर मतदान करतात.परळीत हे सर्व २०१९ पासून सुरू आहे. मतदार यादी मध्ये घोळ करण्याचे हे काम सत्ताधारी पक्षाकडील नगरसेवक, निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेले असे कार्यकर्ते हे काम करतात.मतदान कार्ड बाहेरील लोकांची बनवून घेतली जातात.मृत मतदारांचेही परळीत मतदान झाले निवडणूक आयोग ४५ दिवसांत डाटा डिलिट का करत आहे.सीसीटिव्ही फुटेज का देत नाही.असा सवालही बहादूर भाई यांनी आज केला.परळीत मतदाराऐवजी दुसरेच कार्यकर्ते बटन दाबत होते. प्रशासनही सत्ताधाऱ्यांना सहकार्य करते. विधानसभा निवडणुकीत फक्त २५ कॅमेरे चालू होते.बाकी बंद होते.निवडणूक अधिकारी यांना तक्रार केली परंतु काहीही फरक पडला नाही.आम्ही आतले नाही तर बाहेरचे कॅमेरे पाहतो. असे उत्तर अधिकाऱ्याकडून ऐकायला मिळाले त्यामुळे एकूणच निवडणुकीत कर्मचारी हा कोणाच्यातरी सांगण्यावरून काम करत होता हे दिसून आल्याचे ते म्हणाले. सध्या हा प्रश्न जनतेसमोर आल्यामुळे आम्ही परळीतील घडलेल्या प्रकाराची माहिती प्रकारांसमोर मांडत आहोत.निजामाबाद येथे नगर सेवक पदाची निवडणूक लढविणारा व्यक्ती याने परळीत मतदान केले.याचे आमच्याकडे पुरावे आहेत.परळीच्या मतदार यादीतही प्रशासनाच्या मदतीने घोळ केला जात आहे. डबल नावे टाकली जातात , हैदराबाद येथे मागील वीस वर्षांपासून राहणा-या व्यक्तीची परळीत नावे आहेत. ही सर्व नावे प्रशासनाने वगळावेत व अद्यावत कोणतेही गडबड नसलेले आणि घोटाळा नसलेल्या याद्या निवडणूक आयोगाने आगामी काळात प्रसिद्ध कराव्यात असे आवाहनही बहादुर भाई यांनी केले. या पत्रकार परिषदेला काँग्रेसचे प्रकाश देशमुख, गुलाब देवकर, रणजीत देशमुख, एतेशाम,सिरसाट आदी उपस्थित होते. ***

## अंबाजोगाई गणेशोत्सव यंदा डीजे मुक्त; सुप्रीम कोर्ट व गृहमंत्रालयाच्या निर्देशानुसार डीजेला परवानगी नाही

अंबाजोगाई (बातमीदार):- सुप्रीम कोर्ट व महाराष्ट्र शासनाच्या गृहमंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार यावर्षी गणेशोत्सवात शंभर टक्के डीजे बंदी राहणार असून, याबाबत कोणालाही सवलत मिळणार नाही. बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. मिरवणुकांदरम्यान कोणत्याही प्रकारची हुल्लडबाजी किंवा गोंधळ सहन केला जाणार नाही. सर्व गणेश मंडळांनी शिस्त पाळून उत्सव साजरा करावा, अन्यथा पोलिसांना कठोर भूमिका घ्यावी लागेल असा स्पष्ट इशारा सहायक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांनी दिला आहे. अंबाजोगाई शहरात गणेशोत्सव शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावा यासाठी अंबाजोगाई पोलिसांच्या वतीने नगर परिषदेच्या विलासराव देशमुख सभागृहात आयोजित केलेल्या शांतता बैठकीत ते बोलत होते.

शहर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या पुढाकाराने झालेल्या या बैठकीत कायदा-सुव्यवस्था, वाहतूक नियंत्रण, वीजपुरवठा, स्वच्छता व्यवस्था, विसर्जन मार्ग, ध्वनीप्रदूषण नियंत्रण यांसह अनेक विषयांवर चर्चा झाली. याप्रसंगी अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी कायद्याचे पालन करण्याचे व पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या की, विसर्जन मिरवणुका वेळेत पूर्ण व्हाव्यात यासाठी त्या लवकर सुरू करणे आवश्यक आहे. सर्व विभागांनी विसर्जन मार्गाचा पूर्व सर्व्हे करून अडथळे दूर करावेत, वाहतूक व सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक ती पावले उचलावीत. अंबाजोगाईने आजवर शांततेत गणेशोत्सव साजरा केल्याचे त्यांनी नमूद करत, गणेश मंडळांनी सामाजिक सलोखा जपणारे, सामाजिक संदेश देणारे व जनजागृती करणारे देखावे तयार करावेत, असे आवाहन केले. तहसीलदार विलास तरंगे यांनी यावर्षी गणेश मूर्तींची उंची मर्यादित ठेवावी यासाठी मंडळांनी पुढाकार घ्यावा असे सांगितले. शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या गणेशोत्सव स्पर्धांची माहिती देत त्यांनी, गणेश मंडळांची वाढलेली संख्या लक्षात घेऊन विसर्जनाचा कालावधी कमी करण्यासाठी योग्य नियोजन करण्यात येईल, असे आश्वासन दिले. महावितरणचे उपअभियंता कानडे यांनी वीजपुरवठ्याबाबत योग्य ती काळजी घेतली जाईल असे सांगितले. विजेच्या लोंबकळणाऱ्या तारा, मिरवणुकांसाठी अपुरा वेळ आणि अपुरा पोलीस बंदोबस्त या समस्या अनेक गणेश मंडळ प्रमुखांनी बैठकीत मांडल्या. यावर संबंधित विभागांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. बैठकीस नायब तहसीलदार देशपांडे, नगरपालिकेचे कार्यालयीन अधीक्षक इफ्तिकार शेख, स्वच्छता निरीक्षक अनंत वेडे, तसेच शहरातील सर्व गणेश मंडळ प्रमुख, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. पोलिस प्रशासनाने सर्व मंडळांना सहकार्याची ग्वाही देत, नियमांचे पालन करून उत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. **

सा.परळी परिसर चे
वार्षिक वर्गणीदार व्हा!
-० अंकासाठी संपर्क ०-
मो.९४२२३२८४९३

## भेदभावना दूर सारून संस्कृत भाषा मानवाला जोडते!- पं.चंद्रदेव आचार्य

परळी वैजनाथ, (बातमीदार):- जातिभेद, पंथभेद, उच्च-नीचता, भाषिक, प्रांतीय व वांशिक भेदभावना दूर सारून संस्कृत भाषा ही मानवसमूहाला एकसंघ जोडण्याचे आणि समग्र विश्वात शाश्वत सुख आणि शांतता प्रस्थापित करण्याचे कार्य करते, असे प्रतिपादन संस्कृत साहित्याचे गाढे अभ्यासक आचार्य पंडित चंद्रदेव शास्त्री यांनी केले. येथील संस्कृत प्रेमींच्या वतीने नुकताच आर्य समाज येथे सामूहिक संस्कृत दिन साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री चंद्रदेवजी आचार्य बोलत होते. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभेचे प्रधान स्वामी विद्यानंद सरस्वती हे होते. तर यावेळी व्यासपीठावर सर्वश्री उग्रसेन राठौर, पं. राजेश आर्य, आचार्य सत्येंद्रजी, रंगनाथ तिवार, लक्ष्मणआर्य गुरुजी, पुरस्कारप्रदाते संज्योत जयपाल लाहोटी, गोवर्धन चाटे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

श्री चंद्रदेवजी यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात संस्कृत भाषेच्या वैशिष्ट्यांचे कथन केले. ते म्हणाले- संस्कृत भाषा ही जगात सर्वात प्राचीन भाषा असून तिचे वाङ्मय अतिशय समृद्ध व मौलिक स्वरूपाचे आहे. भौतिक व अध्यात्माची केंद्रबिंदू असलेली ही भाषा आधुनिक संगणक प्रणालीला सुद्धा अतिशय जवळची आहे. म्हणूनच वैज्ञानिकांनी आपल्या संशोधन प्रणालीत या भाषेला महत्त्वाचे स्थान दिले आहे. या भाषेचे ज्ञान सर्वांसाठी खुले असून यात व्यक्ती, समाज, राष्ट्र व अखिल मानव समूह यांच्या सर्वांगीण कल्याणाची शिकवण सामावलेली आहे. यावेळी संस्कृत श्लोक गायन व भाषण स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या जवळपास ६० विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम अशा स्वरूपाच्या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. शिशु, बाल, प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन व गुरुकुलीय अशा विविध गटांमधून घेण्यात आलेल्या या दोन्ही स्पर्धेत शहरातील २१० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. प्रारंभी गुरुकुलाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या वैदिक मंगलगायनात मान्यवरांनी दीपप्रज्वलन करून या कार्यक्रमाचे उद्घाटन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. अरुण चव्हाण यांनी, सूत्रसंचालन तानाजी शास्त्री, डॉ. वीरेंद्र शास्त्री, माणिक गडदे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. नयनकुमार आचार्य यांनी मानले. ***

## दिल्लीतील 'मऱ्हाटी' महाराष्ट्र एम्पोरियममध्ये १६ ऑगस्टपासून गणेशमूर्ती प्रदर्शन व विक्री

नवी दिल्ली (जि.मा.का.बीड):- महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाच्या दिल्लीस्थित 'मऱ्हाटी' महाराष्ट्र एम्पोरियमच्या दालनात गणेशमूर्ती प्रदर्शन व विक्रीला यावर्षी १६ ऑगस्ट पासून सुरुवात होणार आहे. हे प्रदर्शन व विक्री २७ ऑगस्ट २०२५ पर्यंत सुरू राहणार आहे.

महाराष्ट्रातील मूर्तीकारांच्या कलेला प्रोत्साहन देणे, त्यांच्या मूर्तींना दिल्लीसह राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात बाजारपेठ उपलब्ध करून देणे तसेच दिल्लीतील मराठी आणि अमराठी गणेशभक्तांना दर्जेदार गणेशमूर्ती सहज उपलब्ध करून देण्यासाठी मागील ३० वर्षांपासून हे प्रदर्शन भरवले जाते. दिल्ली व राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील ३० पेक्षा अधिक गणेश मंडळांमध्ये गणेशोत्सव साजरा केला जातो. यासह



मराठी तसेच मराठी कुटुंबात गणेशोत्सव साजरा केला जातो.

यंदा एम्पोरियमच्या दालनात ६ इंच ते ३ फूट उंचीच्या एकूण १,००० शाडूच्या मातीच्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती उपलब्ध असतील. या मूर्तींची किंमत ६०० रुपये ते ३० हजार रुपयांपर्यंत आहे. यासोबतच, गणेशमूर्ती सजावटीसाठी लागणारे विविध साहित्यही येथे उपलब्ध आहे . नंदा एस्कोर्टस, त्रिभोवनदास झवेरी, विविध उद्योजक व मान्यवर दरवर्षी येथून गणेशमूर्ती खरेदी करतात. ठाणे येथील मूर्तिकार मंदार सुर्यकांत शिंदे हे अनेक वर्षांपासून येथे गणेशमूर्ती विक्री व प्रदर्शनासाठी ठेवतात. बाबा खडकसिंह मार्गवरील 'मऱ्हाटी' महाराष्ट्र एम्पोरियममध्ये हे प्रदर्शन व विक्री गणेशचतुर्थी २७ ऑगस्ट २०२५ पर्यंत दररोज सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. अधिक माहितीसाठी महामंडळाच्या ०११-२३३६३३६६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. ***

### खरय.. पण...

**श्रीमंतीमुळे अनेक मुली चुकीच्या घरात गेल्या आणि सौंदर्यामुळे अनेक पुरूषांनी चुकीच्या मुलीशी लग्न केले!**

***श्रीमंती आणि सौंदर्य नेहमी सुख देत नाही..!***

### हसरा कोपरा..!

***पुण्याच्या सदाशिव पेठेतली एक लायब्ररी..!***

**सभासद :** आत्महत्या कशी करावी याच्याबद्दल एखादं चांगलं पुस्तक आहे का?

**ग्रंथपाल :** (सभासदाकडे रोखून पहात) आहे ना...पण पुस्तक परत कोण आणून देणार?..!

**संपादकीय...**

# न्याय मिळावा..!

*** सुविचार ***

**'वेदांचा' अभ्यास करणं खूप सोपं आहे.परंतु,ज्या दिवशी आपण दुसऱ्यांच्या ''वेदनांचा'' अभ्यास करू, त्या दिवशी परमेश्वर खऱ्या अर्थानं भेटलाच असे समजा!**

'आज अर्ज की उद्या कर्ज' अथवा 'आज अर्ज की लागलीच कर्ज' अशा लोकप्रिय योजना व त्याची अंमलबजावणी सरकारी, सहकारी व राष्ट्रीयीकृत बँकांपेक्षा ठेवीवर अधिक व्याजदर, बँकेचे सर्व व्यवहार सुलभ विना कटकटीचे आणि झटपट तसेच गर्दी नाही की गोंधळ अशा कारणामुळे आपल्याकडे नागरी सहकारी पतसंस्था, मल्टीस्टेट पतसंस्था व इतर अशा आर्थिक संस्था लोकप्रिय झाल्या. ठेवीदारांचा, कर्जधारकांचा व इतर सर्वसामान्य ग्राहकांचा मिळणारा प्रतिसाद यामुळे अशा संस्थांची संख्या आपल्याकडे झपाट्याने वाढली. सरकारी बँकांपेक्षाही चांगली सेवा या पतसंस्थांमधून मिळू लागल्याने या संस्था लोकाभिमुख झाल्या. या संस्थांनी ठेवीदारांचा मोठा विश्वास संपादन केल्याने ठेवीचा ओघही या संस्थांकडे वाढत गेला.

बीड जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रात अशा पतसंस्था सुरू करणाऱ्या व चालवणाऱ्यांवर सर्वसामान्यांनी ठेवलेल्या विश्वासाला अनेकांनी तडा दिला आहे. स्वार्थाने बरबटून गेलेल्या अनेक संस्था चालकांनी संस्थेत अपहार केला. ठेवीदारांची फसवणूक केली. हजारो ठेवीदरांचे शेकडो कोटी रूपये अक्षरशः लुटले. आपल्या कष्टाचे पैसे मिळवण्यासाठी अशा पतसंस्थेत ठेवलेले पैसे परत मिळवण्यासाठी ठेवीदारांचा गेल्या काही महिन्यांपासून बीड जिल्ह्यात संघर्ष सुरू आहे. या प्रकरणी संबंधित संस्था चालकांवर फसवणुकीचे, अपहाराचे व इतर गुन्हे दाखल झाले आहेत. गुन्हे दाखल झाल्यानंतर कुणी फरारी झाले तर कुणी अटक. आजही या प्रकरणातील इतर दोषी फिरत आहेत. परंतु त्यांच्यावर कारवाई होत नाही. बीड जिल्ह्यातील ठेवीदारांना न्याय मिळावा, त्यांच्या आंदोलनाची दखल जिल्ह्यातील नेते मंडळीने घ्यावी असे सर्वांना वाटले. परंतु याची कुणीच फारशी दखल घेतली नाही. अनेक नेत्यांनी तर या प्रश्नाकडे पाठच फिरवली. यामुळे ठेवीदार राजकारण्यांच्या भूमिकेवर संतप्त झाले. त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

गेल्या आठवड्यात बीड जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे उपमुख्यमंत्री बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. त्यांनी या प्रश्नी लक्ष घालून या प्रश्नाचा आढावा घेतला व योग्य त्या सूचना केल्या. यामुळे आता आपल्याला न्याय मिळेल अशी आशा अनेकांना वाटू लागली आहे. नागरी सहकारी व मल्टीस्टेट पतसंस्थेत झालेल्या घोटाळ्यात एकट्या बीड जिल्ह्यात चौदा संस्था विरूद्ध व त्यांच्या संस्थाचालक व अधिकाऱ्यांविरूद्ध एकशे एकोणतीस गुन्हे दाखल झाले आहेत. या गुन्ह्यात एकशे अठ्ठावीस आरोपींना अटक झाली आहे तर ऐंशी आरोपी आजही मोकाट फिरत आहेत. गुन्हे दाखल झालेल्या संस्था चालकांच्या मालमत्ता व बँक खाती गोठवली गेली आहेत. बीडच्या आर्थिक गुन्हे शाखेने या प्रकरणी प्रामाणिक व गतीने तपास केल्याचा दावा केला असला तरी एकूण या प्रकरणातील तपासावर व झालेल्या कारवाईवर सर्वसामान्य नागरिक तीव्र नाराज आहेत. घोटाळ्यात अडकलेल्या संस्थेत सुमारे एक हजार एकशे चौऱ्याहत्तर कोटी रूपयांचा अपहार झाला आहे. अपहाराची रक्कम व ठेवीदारांची संख्या मोठी आहे. या प्रकरणी काही संस्थेची प्रकरणे विधानसभेतही गाजली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रकरणी लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांची कानउघडणी केली. बीड जिल्ह्यातील ठेवीदारांना न्याय देण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

अपहार व घोटाळा झालेली रक्कम हजार कोटीच्या घरात असली तरी ही संख्या व रक्कम मोठी आहे. ठेवीदारांची संख्याही मोठी आहे. तपास करणारी संबंधित यंत्रणा गेल्या अनेक महिन्यांपासून कागदी घोडे नाचऊन संथगतीने तपास करताना दिसते आहे. अशा गतीने तपास झाल्यास ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळतील तरी केंव्हा असा प्रश्न पडतो. या संस्थांतील गैरप्रकार, अपहार, घोटाळा या सर्वांची सखोल चौकशी व्हावी हा तपास स्वच्छ व पारदर्शक व्हावा, ही प्रक्रिया जलद पार पाडली जावी असे सर्वांना वाटते. या गैरव्यवहाराचा तपास सीआयडी, सीबीआयकडे वर्ग व्हावा असेही अनेकांना वाटते. या प्रकरणात राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी लक्ष घातल्याने ठेवीदारांना न्याय मिळेल अशी आशा आहे. असे घोटाळे होऊ नयेत म्हणून ठोस उपाययोजना व्हायला हव्यात. गुन्हेगारांना कडक शासन व्हायला हवे असे सर्वांना वाटते. ***

# कृत्रिम बुद्धिमत्ता : माणूस कुठे, मशीन कुठे?

आज जगाच्या प्रत्येक कोपऱ्यात एक नाव गुंजतंय, 'कृत्रिम बुद्धिमत्ता..!' कुणी तिला तंत्रज्ञानाचा चमत्कार म्हणतो, कुणी धोक्याची घंटा. कंप्यूटर, मोबाईल, इंटरनेट यांच्या लाटेनंतर ही नवी लाट आपल्यावर येऊन आदळली आहे.

प्रश्न असा ही लाट आपल्याला उंचीवर नेणार की आपल्या पाया खालची वाळू वाहून नेणार? बुद्धीच्या हातातलं खेळणं, की बुद्धीचा प्रतिस्पर्धी? कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे मशीनला मानवी सारखी विचारशक्ती, शिकण्याची क्षमता, आणि निर्णय घेण्याची ताकद देणं.
थोडक्यात, मशीन शिकते, समजते, आणि काम करते. उदाहरण द्यायचं झालं, तर एक अनुभवी कारागीर apprentice ला शिकवतो, आणि तो apprentice नंतर स्वतः काम करू लागतो, पण इथे तो apprentice म्हणजे मशीन, आणि गुरू म्हणजे आपण.
पण इथेच प्रश्न निर्माण होतो की, गुरूचं काम apprentice काढून घेत असेल, तर गुरूचा उपयोग उरणार का? आपल्याला मिळणारे लाभ योग्य वापरल्यास...? मान्य करावं लागेल, AI ने आपलं जीवन अनेक बाबतीत सोपं केलं आहे.

**वेग आणि अचूकता:-** वैद्यकीय क्षेत्रात काही सेकंदांत रोगाचे निदान, उद्योगात उत्पादन प्रक्रियेत वेग, बँकिंगमध्ये फसवणूक ओळखणं, हे सगळं आता AI च्या मदतीने होतंय.

**नवीन क्षेत्रांची दारे :-** AI मुळे डेटा सायन्स, प्रॉम्प्ट इंजिनिअरिंग, AI नैतिकता, यांसारख्या पूर्णपणे नव्या क्षेत्रांची निर्मिती झाली आहे.

**मानवी वेळ सर्जनशीलतेसाठी मोकळी:-** जर रोजच्या कंटाळवाण्या कामांचा बोजा AI उचलणार असेल, तर माणूस आपली ऊर्जा कला, संशोधन, आणि शोधात वापरू शकतो.

**पण धोक्याची चाहूलही:-** जसे औषध योग्य मात्रेत असेल तर उपचार, पण अति मात्रेत विष होते अगदी तसंच AI चंही आहे.

**बेरोजगारीची शक्यता :-** उत्पादन, लेखन, डिझाईन, अगदी सॉफ्टवेअर कोडिंग, अशा अनेक क्षेत्रांत मशीनने मानवी कामाची जागा घेण्यास सुरुवात केली आहे.

Goldman Sachs च्या अहवालानुसार, पुढील दशकात जगातील ६-७% नोकऱ्या यामुळे धोक्यात येऊ शकतात.

**बुद्धीवर गंज:-** रोजच्या गणितासाठी आपण कॅल्क्युलेटरवर अवलंबून राहिलो, आणि हळूहळू साधं बेरीज-वजाबाकी विसरलो, तसंच, जर विचार, कल्पना, आणि लेखनसुद्धा AI कडे सोपवलं, तर आपल्या बुद्धीचं काय होईल? अभ्यास सांगतो की, सतत AI वर अवलंब केल्याने स्मरणशक्ती, कल्पनाशक्ती, आणि विश्लेषणशक्ती कमकुवत होण्याचा धोका आहे.

**नैतिक प्रश्न:-** मशीनने घेतलेले निर्णय नेहमीच न्याय्य असतील का? जर डेटा मध्ये पक्षपात असेल, तर मशीनचे निर्णयही पक्षपाती होतील. मग कोण जबाबदार? मानवी बुद्धीची जपणूक, गरजेची कवायत अख हा शत्रू नाही, पण मित्रही फक्त काही अटींवर.

**१. मानव + AI = यश :-** AI चा वापर करून आपली क्षमता वाढवणं हेच भविष्याचं सूत्र. मशीनने माहिती द्यावी, पण निर्णय मानवी मूल्यांवर आधारित असावेत.

**२. कौशल्य विकास:-** तंत्रज्ञान बदलणार, काम बदलणार, त्यामुळे सतत शिकणं आणि कौशल्य वाढवणं गरजेचं आहे.

**३. सर्जनशीलतेत गुंतवणूक :-** चित्रकला, लेखन, संगीत, विज्ञानातील नवे शोध, हे क्षेत्र माणूसच जिवंत ठेवू शकतो. AI फक्त साधन, प्रेरणा आणि क्रांती मानवी मनातच जन्म घेते.

**भविष्य उज्वल की धूसर?** कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्याला हात देऊन उभं करेल की आपल्या खांद्यावरून उडी मारून पुढे जाईल, हे आपल्या वापरावर ठरेल. जर आपण आळशी झालो, विचार करणं बंद केलं, आणि सर्व निर्णय मशीनवर सोपवले, तर अधोगती ठरलेली आहे. हे आपल्याला विसरून चालणार नाही. पण जर आपण तिचा वापर सहाय्यक म्हणून गुरू म्हणून नाही, केला तर AI आपल्याला अशा उंचीवर घेऊन जाईल, जिथे आपली बुद्धी आणि तंत्रज्ञान दोन्ही चमकतील. मशीन विचार करेल, पण माणसाने स्वप्न पाहिली पाहिजेत.

मशीन मोजमाप करेल, पण माणसाने जग मोजता येणार नाही अशी कल्पना केली पाहिजे. आणि म्हणूनच, कृत्रिम बुद्धिमत्ता ही माणसाच्या बुद्धीचा पर्याय नाही, तर तिचा साथीदार आहे जोपर्यंत आपण तिला तसंच ठेवतो. तेव्हा कृत्रिम बुद्धिमत्तेला आपण समजून घेतल्या पाहिजे. तिच्या जोरावर आपण प्रगती करू शकतो. हे खरे असल्या तरी आपल्या बुद्धीला जागृत ठेवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर योग्य ठिकाणी आणि योग्य वेळीच केला पाहिजे प्रत्येक वेळी कृत्रिम बुद्धिमत्ता वापरली तर खरंच आपण आळशी बनू आपली बुद्धिमत्ता कायम गंध येऊन की काहीच काम करणार नाही हा धोका लक्षात घेऊन कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करावा तूर्ता इतकेच.

**– प्रदीप दे. कुलकर्णी**
माजलगाव, जिल्हा बीड

# प्रशासकीय इमारत येथे ध्वजारोहणाचा कार्यक्रम

बीड, (जि.मा.का.) जिल्ह्यात विविध ठिकाणी ध्वजारोहण केले जाणार असून प्रशासकीय इमारतीच्या प्रागंणात १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाचे ध्वजारोहणाचा कार्यक्रम अप्पर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक बीड, यांच्या हस्ते यांच्या सकाळी ८.३० वाजता होणार आहे. हा ध्वजारोहण समारंभ संपल्यानंतर अधिकारी व कर्मचारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रागंणात ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभास सकाळी ८.४५ पूर्वी शासकीय गणवेषात उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**
* वर्ष ०९ * अंक १५ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट २०२५ * किंमत : २ रू.

## परळी नगर परिषद व अ.भा.वारकरी मंडळाच्या वतीने संत ज्ञानेश्वर महाराज सुवर्णमहोत्सवी जन्मोत्सवानिमित्त परळीत हरिपाठ, सामुहिक पसायदान व पालखी सोहळा

परळी वैजनाथ, (बातमीदार):- संत ज्ञानेश्वर महाराज यांचा यावर्षी ७५० वा सुवर्ण महोत्सवी जन्मोत्सव असुन या निमित्त परळी नगरपरिषदेच्या वतीने व अखिल भारतीय वारकरी मंडळ व राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे ताईसाहेब व माजीमंत्री आ.धनंजय मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार दि.१५ ऑगस्ट रोजी परळीत सामुहिक पसायदान व हरिपाठ आणि भव्य पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.या सोहळ्यात परळी व परिसरातील वारकरी ,भाविक व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन संयोजक न.प.मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे व ह भ प रामेश्वर महाराज कोकाटे अखिल भारतीय वारकरी मंडळ यांनी केले आहे.

श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचा सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जन्मोत्सव राज्यात मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे.यानिमीत्त परळी नगरपरिषदेच्या वतीने व वारकरी मंडळाच्या वतीने शुक्रवार दि.१५ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथुन परळी शहर व परिसरातील असंख्य महिला भजनी मंडळ, हजारो वारकरी व संत,महंतांच्या उपस्थितीत पालखी सोहळा काढण्यात येणार आहे. शिवाजी चौक बस्थानक,अग्रवाल लॉज,मोंढा मार्केट, राणी लक्ष्मीबाई टॉवर मार्गे लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर येथे समारोप झाल्यानंतर सामुहिक पसायदान व हरिपाठ घेण्यात येणार आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ.भा.वारकरी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले हे रहाणार असुन प्रमुख उपस्थिती ह.भ.प.तुकाराम महाराज मुंडे शास्त्री,ह.भ.प.वासुदेवानंद महाराज बैरागी,ह.भ.प.भरत महाराज गुट्टे.ह.भ.प.विश्वंभर महाराज उखळीकर,गोविंद महाराज मुंडे, बाळासाहेब महाराज लटपटे,जगदीश महाराज सोनवणे,विजयानंद महाराज आघाव,पंडित महाराज गिरी,अर्जुन महाराज शास्त्री,बंडोपंत महाराज ढाकणे,भरत महाराज सोडगीर आदींची प्रमुख उपस्थिती रहाणार आहे.या पालखी सोहळ्यास व सामुहिक पसायदान,हरिपाठ कार्यक्रमास परळी व परिसरातील भाविकांनी सहभागी होवुन महाराष्ट्राची वारकरी सांप्रदायाची परंपरा जोपासावी असे आवाहन संयोजकांनी केले आहे.**

## बिजभांडवल योजना व थेट कर्ज योजनेसाठी ऑफलाईन अर्ज सादर करावेत

बीड, (जिमाका):- राज्यातील इतर मागासवर्गीय सर्वांगिण कल्याणासाठी कार्यरत असलेले महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ आणि या महामंडळा अंतर्गत विविध इतर मागास प्रवर्गातील कार्यरत १३ उपकंपन्या शासनाने स्थापन केलेल्या असून बीड जिल्हास्तरावरील कामकाज कार्यन्वित करण्यात आलेले असून या महामंडळ व उपकंपन्या मार्फत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी २० टक्के बिज भांडवल कर्ज योजना, रु. १.०० लक्ष थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना व महिला स्वंयसिध्दी व्याज परतावा योजना अशा एकूण सहा योजना राबविण्यात येत आहेत.

यापैकी वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना व महिला स्वंयसिध्दी व्याज परतावा योजना या पुर्णपणे ऑनलाईन स्वरुपाच्या असून इतर मागास प्रवर्गातील पात्र अर्जदारास नाव नोंदणीसाठी महामंडळाच्या www.msobcfdc.org या वेबपोर्टवर आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. उर्वरीत बिजभांडवल योजना व थेट कर्ज योजना ह्या ऑफलाईन स्वरुपाच्या असून त्याचे अर्ज जिल्हा कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.

याबात अधिक माहितीकरीता महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादीत, जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृहासमोर, बीड-नगर रोड, बीड दुरध्वनी क्रमांक ०२४४२-२३२६२४ या पत्यावर संपर्क साधावा, असे अवाहन महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक बी.एस. भोसले बीड यांनी केले आहे. ***

## संत धुराबाई शाळेत विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप

परळी वैजनाथ, (बातमीदार):- शहरातील शंकर पार्वतीनगर येथील संत धुराबाई आदर्श प्राथमिक विघालयात आझादी का अमृतमहोत्सव अंतर्गत राबविण्यात आलेल्या अभियाननिमित्त शाळेतील गरजू मुलांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले यावेळी शाळेचे मुख्याध्यापक वसंत राठोड, शाळेतील शिक्षक यांच्या हस्ते मुलांना शालेय गणवेश, बुट व सॉक्स याचे वाटप केले.

या कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक मधुकर बोचरे, बालाजी कांबळे, रशिकांत धायगुडे, सुनिल शेळके, शिवकुमार तुपकर, सारंग टेकाळे, किरण साळुंके, निखिल सावजी, कैलास पतंगे, नामदेव शिंदे, विनोद हादवे, निवृत्ती येवले, बालाजी बिदरकर, सिध्दार्थ देशमाने, प्रेमदास राठोड, श्रीमती कदम मॅडम, श्रीमती पुल्ले मॅडम यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते. ***

## दरवळणारा सुगंध...



*शून्यातून विश्व निर्माण करायचं असेल तर मेहनत अतिशय महत्त्वाची, आपल्याकडे काही नसताना ही स्वप्न डोळ्यात ठेवून रात्रंदिवस झटणारे लोकच जग बदलतात. कारण कष्ट, जिद्द, मेहनत आणि सकारात्मक विचार हेच खरे भांडवल असते..!*


